लोकमत

# एकत्रित प्रयत्नांनी विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्ज्वल

## जयकुमार रावल : २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप समारंभप्रसंगी प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**दोंडाईचा :** शिक्षणाबाबत सर्वच घटकांमध्ये जागरुकता वाढत आहे. विद्यार्थ्यांना सर्वच बाबींमध्ये प्रगत करण्यासाठी शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. त्यासाठी पालक, शिक्षक व विविध सामाजिक संघटना यांनी एकत्रितपणे काम केल्यास विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्ज्वल होईल, असे प्रतिपादन राज्याचे रोजगार हमी व पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी येथील समारंभात केले .

येथील स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचा दादासाहेब रावल प्राथमिक शाळेचा विद्यार्थ्यांना मुंबई येथील अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानतर्फे २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपासाठी आयोजित कार्यक्रमात मंत्री जयकुमार रावल बोलत होते. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सरकारसाहेब रावल होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोजगार हमी योजनेचे - ओ एस डी- प्रीतम झाल्टे, उपनगराध्यक्ष रवींद्र उपाध्ये, मुंबईचे अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानचे ट्रस्टी अमोल वंजारे, संस्थेचे सचिव सी.एन. राजपूत, विकासाधिकारी आर.टी. गिरासे, दोंडाईचा बाजार समिती सभापती नारायण पाटील, भाजप जिल्हा महिला आघाडीचा चंद्रकला सिसोदिया, नगरसेवक करणसिंह देशमुख, नगरसेवक निखिल जाधव, सागर मराठे, नरेंद्र कोळी, छोटू मराठे, प्रदीपकुमार कागणे, डॉ मुकुंद सोहोनी, माजी नगरसेवक प्रवीण महाराण, किशन दोधेजा, रमेश पारख आदी होते.

अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानचे अमोल वंजारे म्हणाले की, अक्षरा सामाजिक संस्थेमार्फत गेल्या १० वर्षांपासून शैक्षणिक कार्य सुरु आहे. आतापर्यंत गरजू व गरीब असलेल्या १७ हजार विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, दप्तर असे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आगामी काळातही विद्यार्थ्यांसाठी भरीव स्वरुपात मदत दिली जाईल, असे आश्वासनही वंजारे यांनी दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक एम.एस. सोनवणे यांनी केले तर सूत्रसंचालन डी.एस. गिरासे यांनी केले.